# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १२.०८.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ११/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन
३९,२००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ११/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण १० ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**अपघात :—** दिनांक ११/०८/२०२२ रोजी फिर्यादी संजय गणपत फुलेवार व्य चालक रा गाडीपुरा हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.३०.०६.२२ रोजी ०७.०० वा चे सु रेल्वे रॅक रेल्वेस्टेशन हिंगोली येथे यातील आरोपीने त्याच्या ताब्यातील ट्रक क्र एमएच २६ एच ६४०४ हे भरधाव वेगात हयगईने व निष्काळजीपने गाडी पाठीमागे घेवुन फिर्यादीस धडक देवुन फिर्यादीस गंभीर जखमी करून खांदयाची हाड फॅक्चर केले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.

दिनांक ११/०८/२०२२ रोजी फिर्यादी बंडु लक्ष्मण कांबळे रा कुरूंदा ता वसमत यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत शहर येथे कलम २७९,३३७,३३८,४२७ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि. ०७.०८.२२ रोजी चे सकाळी १०.३० वा चे सु वसमत नांदेड रोडवर साईमंदिराजवळ यातील फिर्यादी व जखमी मुलगी असे त्याचे मोसावर जात असतांना समोरून येणारा ॲटो क्र एमएच २६ बिडी १८१२ चे चालकाने त्याच्या ताब्यातील ॲटो भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोसाला उजव्या बाजुने धडक देवुन फिर्यादीस मुक्कामार व फिर्यादीची मुलगी हिस तिच्या उजव्या पायास मार लागुन फॅक्चर झाले असुन मोसाचा साईड ग्लास फुटुन अंदाजे २०० रू चे नुकसान झाले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत शहर पोलीस तपास करित आहेत.

दिनांक ११/०८/२०२२ रोजी फिर्यादी अभिषेक सुभाष नरवाडे व्य शिक्षण रा चिंचखेडा ता सेनगाव यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत शहर येथे कलम ३०४ अ,२७९,३३७,३३८,४२७ भादव प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०५.०८.२२ रोजी चे सकाळी ०९.३० वा चे सु जिंतुर ते सेनगाव रोडवर लिंबाळा तांडयाचे समोरील आर के धाब्यासमोर आरोपी याने त्यांच्या ताब्यातील मोसा भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन अचानक मोसा समोर कुत्रा आल्याने ब्रेक दाबल्याने मोसा स्लीप होवुन रोडवर खाली पडल्यामुळे फिर्यादीचे डोक्याला छातीला मुका मार लागला आरोपीचे डोक्यास गंभीर मार लागुन सरकारी दवाखाना विष्णुपुरी नांदेड येथे उपचार चालु असतांना मरण पावले आहे यातील आरोपी स्वताचे मरणास कारणीभुत झाला व फिर्यादीस जखमी केले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत शहर पोलीस तपास करित आहेत.